जा क्र मसके/वाकवली/प्रअवा/ ५१४/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.
दिनांक : 10 DEC 2022

प्रती,

मा.प्रभारी अधिकारी,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय : काजू कलमे ठेका पध्दतीने बांधणीच्या जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणे बाबत....**

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली या केंद्राच्या "वाकवली विभाग" या प्रक्षेत्रावर काजू कलमे बांधणी व संगोपण हे काम ठेका पध्दतीने करावयाचे आहे. तरी यावावतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर **(www. dbskkv.org)** करणेस विनंती आहे.

**सोबत:—** प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

आपला विश्वासू,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी

Scanned by CamScanner

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र/मसकें/प्रअवा/५७३/२०२२ दिनांक 10 DEC 2022

# जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्राला मा. संशोधन संचालक महोदय, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली यांनी येत्या सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात १३००० नग काजू कलमे (वेंगुर्ला०४–१०००० व वेंगुर्ला०७–३०००) अशी एकुण १३००० नग काजू कलमे पत्र क्र .जा.क्र डॉबासाकोकृवि/संशो/बियाणे/२६६९/२०२२, दिनांक १९/०५/२०२२ अन्वये उद्दिष्ट दिलेले आहे. काजू कलमे बांधणी नंतर विक्री योग्य काजू कलमे मिळण्याचे प्रमाण ७०% गृहित धरून १३,००० नग विक्री योग्य कलमे मिळण्यासाठी साधारण १९००० नग काजू कलमे बांधणे आवश्यक आहे. काजू कलमे करण्याच्या उद्देशाने करावयाच्या कामाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ क्र | कामांचा तपशिल<br>कामाचा कालावधी ०१ जानेवारी २०२३ ते १५ जून २०२३ | विक्रि योग्य कलमे उद्दीष्ट |
|---|---|---|
| १ | काजू कलमांसाठी पिशव्या भरणे, वहातूक करणे, काजूची रोपे तयार करणे, काजू फांदया डिफोलिएशन करणे, काजू अंकुर काडया झाडावरून काढून, काजू कलमे बांधणे, बांधलेल्या काजू कलमांची निगा राखून, वेळेत कलमांच्या पट्टया सोडणे व विक्रि योग्य काजू कलमे १५ जून २०२२ अखेरीस प्रक्षेत्राच्या ताव्यात देणे. | वेंगुर्ला–०४ काजूकलमे– १०,०००<br>वेंगुर्ला–०७ काजूकलमे– ३,०००<br>एकूण कलमे– १३००० |

उपरोक्त प्रमाणे कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरुन दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये होणा-या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक ः २२/१२/२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभाग अंतर्गत काजू कलमे ठेका पध्दतीने बांधणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा बंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जवाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

- उपरोक्त कामाच्या अटी व शर्तीः–

१ ठेकेदाराने दरपत्रक सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

(PTO)

Scanned by CamScanner

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार, विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. ज्याचे दरपत्रक सर्वात कमी आहे. त्यांना कामाचा आदेश दिल्यानंतर त्यांनी अनामत रक्कम म्हणून रु.५०००/- (रु.पाच हजार मात्र) या रक्कमेचा धनाकर्ष (D.D.) " डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली" या नांवे 'आरडीसीसी बँक शाखा वाकवली येथे देय' काढावा. दरपत्रकासोबत पॅनकार्ड व आधारकार्डची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

३ काजू वडस्टीक या प्रक्षेत्राच्या झाडांवरुन स्वःत काढून काजू कलमे मार्च अखेर पर्यंत बांधावयाची आहेत आणि कलमे बाधणीनंतर माहे १५ जून २०२३ पर्यंत कलमांचे संगोपण करून १५ जुन २०२३ अखेरीस विक्रीयोग्य काजू कलमे मोजून विभागाचे ताब्यात दयावयाची आहेत.

४ काजू कलमे बांधणीच्या बिलाचा अदायगी तपशिल.

a. पहीला हप्ता :— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. १ हे काम केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

b. दुसरा हप्ता:— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. २ हे काम केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

c. तिसरा हप्ता:— कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. ३ व ४ प्रमाणे तसेच ५ मधील काम हे मार्च २०२३ मध्ये पुर्ण केल्यानंतर दरपत्रकातील नमुद दरानुसार अदा करणेत येईल.

d. चौथा हप्ता कामाच्या तपशिलातील कामांपैकी अ.क्र. ५ मधील कामे माहे एप्रिल २०२३ ते १५ जुन २०२३ पर्यंत केलेल्या कामाच्या दरपत्रकातील नमुद दरानुसार तसेच विक्रियोग्य काजु कलमे विभागाचे ताब्यात दिलेवर अंतीम बिलातुन मागील देय्यकांचे हप्ते वजा करून अंतीम देय्यक आदा करणेत येईल.

५ काजू कलमे जगण्याचे प्रमाण ७० %गृहीत धरूनच आपणास निविष्ठा पुरविण्यात येतील काजू कलमे यशस्वी होण्याचे प्रमाण ७० % पेक्षा कमी आल्यास कमी असलेल्या कलमांची वसुली अंदाजपत्रकातील प्रती कलमांच्या दरानुसार एक तृतियांश इतकी जी रक्कम असेल त्याप्रमाणे अंतिम बिलामधून अथवा अनामत रकमेतून वसूल करणेत येईल.

६. बांधलेल्या काजू कलमांना जर का वातावरण पोषक मिळाले तर काजू कलमे ७०% पेक्षा जास्त मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब काजू कलमे ताब्यात घेण्याच्या वेळी जर का काजू कलमे १३,००० पेक्षा जास्त मिळाली तर जास्त मिळालेल्या कलमांच्या देयकासाठी प्रति कलम रूपये ठेकेदाराने दिलेल्या दरपत्रकाप्रमाणे वाढीव मंजुरी घेवून सदर बिलाची अदायगी करण्यात येईल.

७. प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधितांकडे जमा करावयाचे आहे.

८ ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही. कलमांबावत दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९ ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बॅंक खाती **N.E.F.T./R.T.G.S.** धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.

१० ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

Scanned by CamScanner

११ठेक्याच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान/चोरीझाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल व त्यावावतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

१२ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

१३सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१४ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू.१00/- च्या बॉड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१५. प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

सोबत:—दरपत्रक मसुदा

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड

Scanned by CamScanner

श्री / श्रीमती . ____________________ स्ती/17

मु . पो . ____________________ ता . ____________

जि . रत्नागिरी .

दि .

प्रति .

मा . संचालक,

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली .

(वाकवली विभाग)

विषय : प्रक्षेत्रावरील काजु कलमे बांधणीचे काम ठेका पध्दतीने करणेसाठी दरपत्रक....

**संदर्भः— आपल्या कार्यालयाची जाहिर नोटिस जा.क्र.मसंकें/प्रअवा/ /२०२२,**

**दि.**

महाशय,

वरील विषयान्वये मी आपणास कळवू इच्छिते/इच्छितो की, मी आपल्या प्रक्षेत्रामधील काजु कलमे बांधणीची कामे आपल्या अधिका-यांच्या सुचनेनुसार आपल्या अटी/शर्तीस अधीन राहून करावयास तयार आहे . मी प्रक्षेत्रावरील कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहीले आहे . सदर कामांसाठी मी खालील प्रमाणे दर सादर करीत आहे .

| अ क्र | **कामांचा तपशिल**<br>कामाचा कालावधी 0१ जानेवारी २0२३ ते १५जुन २0२३ | बांधावयाची विक्रियोग्य कलमे | दर प्रती कलम रू. |
|---|---|---|---|
| १ | पिशव्या भरणे,वहातूक करणे,काजूची रोपे तयार करणे,काजू फांदया डिफोलिएशनकरणे, काजू अंकुर काडया झाडावरून काढून काजू कलमे बांधणे, काजू कलमांची निगा राखून, वेळेत कलमांच्या पट्टया सोडणे व विक्रि योग्य काजू कलमे १५ जुन २०२२ पर्यंत ताव्यात देणे . | वें.—०४—१०,००० <br>वें.—०७— ३,०००<br>**एकूण— १३,०००** | |

वरील संदर्भानुसार जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत सर्व अटी अ.क्र. ०१ ते १५ नुसार काम करण्यास मी तयार आहे. तरी माझे दरपत्रक मंजूर करून मला संबंधीत कामाचा ठेका आपल्या प्रक्षेत्रावर काम करण्याची संधी द्यावी . ही विनंती .

सोबत:— संमतीपत्र .

आपला विश्वासू

दिनांक:—

ठिकाण:—

नाव:—

पत्ता:—

भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्र:—

Scanned by CamScanner